

# श्रीसाईलीला

एप्रिल
मे
जून
१९५४

वर्ष ३१ वें. किरकोळ १० आणे. अंक २

[ स्थापना १९२१ ]

# बाबा असल्यावर



(कसलीही) काळजी

चिंता

भय

कशाला

म्हणून आपल्या ऐपतीप्रमाणें चांदीचे अगर सोन्याचें लॉकेट, आंगठ्या खरेदी करा व गळ्यांत किंवा हातांत वापरा म्हणजे आपल्याला लगेच आनंद प्राप्त होऊन समाधान लाभेल.

**चांदीचें लॉकेट -॥- -॥॥- १। १॥. आंगठ्या -॥- -॥॥- १। १॥**

**सोन्याचें लॉकेट रु. १०, रु. १५ व रु. २५**

**चांदीच्या पादुका स्टँडसह रु. ७०. मिनाकारी फोटो**

**-॥-१ रु. ४ रु. प्रमाणें सुटे मिळतील.**

वि. सू:—व्यापाऱ्यांना सवलतीचे दरानें मिळेल.

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ

ठाकुरद्वार, मुंबई २.

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्रीसाई लीला त्रैमासिक

संपादक

श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक

श्री. रामचंद्र महादेव राणे

## श्रीसाईलीला मासिकासंबंधीं

* श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक दर वर्षी मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३० तारखेस प्रसिद्ध होतात.
* किरकोळ अंकास दहा आणे.
* वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २–४–०
* वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येतें.
* मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.
* वर्गणी मनिऑर्डरनें ' व्यवस्थापक श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १ ' या पत्त्यावर पाठवावी.
* या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.
* आलेले लेख प्रसिद्ध करणें अगर न करणें व त्यांत जरूर तो फेरबदल करणें याबद्दल सर्व हक्क संपादकांकडे आहेत. —संपादक

**वार्षिक वर्गणी**
**रु. २-४-० (ट. ख. स.)**

**किरकोळ अंक**
**दहा आणे**

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखक | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | श्रीसाईवाक्सुधा | | |
| २ | प्रिय वाचक | संपादक | ८ |
| ३ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | १४ |
| ४ | सच्चिदानंदाचा साक्षात्कार | सौ. नलिनी मुळगांवकर | २८ |
| ५ | बाबांचा ब्रह्मजिज्ञासूला उपदेश | पुरुषोत्तम मराठे | २९ |
| ६ | संसारांत कसें वागावें | श्रीरामकृष्ण परमहंस | ३३ |
| ७ | आपलें कोठें चुकतें | स्वामी रामदास | ३८ |
| ८ | शाश्वतसुखाचा लाभ | श्री. रमण महर्षि | ४० |
| ९ | सुखाचा मार्ग | स्वामी विवेकानंद | ४२ |
| १० | ज्ञानोत्तर प्रेमभक्ति पुस्तक परीक्षण | वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर | ४६ |
| ११ | श्रीरामनवमी महोत्सव | आमचे प्रतिनिधि | ५८ |
| १२ | आचरती संत असिधाराव्रत | डॉ. श्री. बा. देव | ६० |
| १३ | शिरडी-वृत्त | | ६१ |


# लेखकासाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.

(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

(४) स्वीकृत लेख अंकांत प्रसिद्ध झाल्यावर यथाशक्ति मोबदला देण्यांत येईल.

—संपादक

# श्री साई लीला



## श्री साई वाक्सुधा

" कुठेंही असा कांहींही करा । एवढें पूर्ण सदैव स्मरा ।
कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा । मज निरंतरा लागती ॥
येणें निदर्शित ऐसा जो मी । तोच मी सर्वांच्या अंतर्यामीं ।
तोच मी हृदयस्थ सर्वगामी । असें मी स्वामी सकळांचा ॥
भूतीं सबाह्याभ्यंतरीं । भरूनि उरलों मी चराचरीं
हें सकळ सूत्र ईश्वरी । सूत्रधारी मी त्याचा ॥
मी सकळ भूतांची माता । मी त्रिगुणाची साम्यावस्था ।
मीचि सकलेंद्रिय प्रवर्ता । कर्ता धर्ता संहर्ता ॥
लक्ष लावी जो मजकडे । नाहीं तयास कैंचेंही सांकडें ।
तोच माझा जें विसर पडे । माया कोरडे उडवी तें ॥
दृश्यजात हें मत्स्वरूप । कीड मुंगी रंक भूप ।
हें स्थिर जंगम विश्व अमूप । हेंचि निजरूप बाबांचें ' ॥

**श्रीसाईसच्चरित** अ. ३, ओ. १४३ ते १४८

# -प्रिय वाचक-

## चालू अंकाविषयीं थोडेसें

चालू वर्षापासून श्रीसाईलीलेचा प्रत्येक अंक कांहीं विशिष्ट योजना आंखून तयार करण्याचा संकल्प योजलेला आहे. मार्चचा अंक रामनवमीच्या सुमारास प्रसिद्ध होत असल्यामुळें, गेल्या अंकीं श्रीरामकथा आणि तदनुषंगिक विषय यांचाच समावेश केला होता. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, पं. जवाहरलाल नेहरू इत्यादि पुरुष-श्रेष्ठांचे श्रीराम-विषयक लेख गेल्या अंकासाठीं संकलित करण्यांत आले होते. रसिक व चोखंदळ वाचकांनीं या योजनेचें कौतुक केल्याबद्दल मी त्यांचा उतराई आहें. प्रस्तुत जूनचा अंक हा एका दृष्टीनें संत-उपदेश-विशेषांक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं श्रीसाईबाबा, श्रीरामकृष्ण परमहंस, श्रीस्वामी विवेकानंद, श्रीरमणमहर्षि, श्रीस्वामी रामदास यांनीं संसारी जनांना केलेला उपदेश विविध लेखांतून या अंकीं देण्यांत आला आहे. पुढील अंक हा पुण्यतिथिविशेषांक म्हणून काढावयाचा आहे. त्याची पृष्ठसंख्या नेहमींपेक्षां बरीच अधिक राहील. तरीहि किरकोळ अंकाची किंमत मात्र दहा आणेच ठेवण्यांत येणार आहे. त्या अंकांत मार्मिक व उद्‌बोधक अशा अनेक संत-कथा देण्याचा विचार आहे. अर्थात हा संकल्प मूर्त स्वरूपांत उतरणें हें बाबांच्या कृपेवरच सर्वस्वीं अवलंबून आहे.

× × ×

## सदभिरुचि सोडून लिहिलेलें एक अप्रशस्त पुस्तक

श्री. अ. ग. वायंगणकर नांवाच्या एका गृहस्थानें 'श्रीसाईभक्तांची शिरडी' या नांवाचें ४८ पृष्ठांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकावर किंमत दिलेली नाहीं. परंतु केसरींत आलेल्या जाहिरातीवरून कांहीं भक्तांनीं सव्वा रुपया पाठवून पुस्तक मागविलें असें कळतें. ४८ पृष्ठांच्या चोपड्याला सव्वा रुपया किंमत ठेवून तें विकणें हें साईभक्तीचें द्योतक नव्हे असें मला वाटतें. पुस्तकांत प्रारंभापासून अखेरपर्यंत सदभिरुचीचा अभाव ठळकपणें जाणवतो. मुखपृष्ठावर अगदीं वरच्या बाजूस 'ए हँडबुक ऑफ संस्थान शिरडी' असे शब्द इंग्रजी टाईपांत छापलेले आहेत. लेखकाचा तसा उद्देश नसला तरीहि या शब्दांमुळें हें पुस्तक 'शिरडी संस्थान' कमिटीचें अधिकृत पुस्तक असावें असें सकृद्दर्शनीं वाचकाला वाटल्याखेरीज राहणार नाहीं, हें कोणीहि नाकारूं शकणार नाहीं.

पुस्तकांच्या प्रारंभीं साईबाबांच्या जपाचे 'महामंत्र' म्हणून दोन मंत्र दिले आहेत. 'महामंत्र व त्याची धारणाचे सर्व हक्क लेखक व प्रकाशकाचे स्वाधीन असून त्यांच्या लेखी परवानगीवांचून छापतां येणार नाहींत' असें बजावण्यांत आलें आहे ! हा सारा प्रकार मला अत्यंत अनुचित वाटतो. साईबाबांचा विशिष्ट असा कोणताहि मंत्र नाहीं अथवा कोणत्या मंत्राची धारणा करण्याचा कसलाहि विधि बाबांनीं सांगितला नाहीं. या पुस्तकांत दिलेला धारणाविधि 'हिंदु' पद्धतीचा आहे. बाबा हे केवळ हिंदूंचे नसून सर्व धर्मांचे, सर्व जातींचे व सर्व पंथांचे आहेत. त्यांना विधिविधानांचें अवडंबर नको असून केवळ भक्ताचें प्रेम तेवढें हवें आहे. 'मी माझिया भक्तांचा अंकिला। आहें पासींच उभा ठाकला। प्रेमाचा मी सदा भुकेला। हांक हांकेला देतसें॥' हे बाबांचे उद्गार भक्तांनीं आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावे. अंतःकरणपूर्वक भक्ति-प्रेमाचा जिव्हाळा फक्त बाबांना पाहिजे आहे. त्यांना 'महामंत्र' नकोत आणि महामंत्राच्या धारणेचें स्तोम त्याहून नको.

या पुस्तकांत पुढें शिरडी, बाबांचें चरित्र, त्यांचे कांहीं भक्त इत्यादि गोष्टींची त्रोटक माहिती दिली आहे. त्यांत जें कांहीं चांगलें आहे तें नवीन नाहीं, आणि जें कांहीं नवीन आहे तें चांगलें नाहीं ! उदाहरणार्थ, 'पुण्याचे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे बाबांच्या भक्तगणांत' असल्याची 'माहिती' लेखकानें दिली आहे ! लो. टिळक हे खापर्डे यांजबरोबर शिरडीस आले होतें हें खरें असलें तरी ते बाबांचे 'भक्त' होते असें म्हणतां येण्यासारखें नाहीं. उलट कै. तात्यासाहेब केळकर यांनीं टिळकांच्या शिरडी-भेटीचें जें वर्णन केलें आहे त्यांत किंचित् उपरोधाचाच वास आहे. केवळ टिळक शिरडीला आले होते एवढ्यावरून त्यांना साईभक्त म्हणायचें झालें तर, गेल्या महाराष्ट्रदौऱ्यांत पं. नेहरू शिर्डीस आले होते म्हणून त्यांचीहि गणना साईभक्तांत करावी लागेल ! कोण कोण मोठे लोक बाबांचे भक्त होते यावरून बाबांचें अजोड मोठेंपण सिद्ध व्हावयाचें नसून, त्यांचें मोठेपण स्वयंसिद्ध आहे. त्याला जाहिरातबाजीची यत्किंचितहि गरज नाहीं. परंतु हें पुस्तक अथपासून इतिपर्यंत जाहिरातबाजीनें माखलेलें आहे. ४८ पानांच्या या चोपड्यांत २० पानें मजकूर, लेखकानें संस्थान–कमिटीच्या पदाधिकाऱ्यांशीं केलेल्या पत्रव्यवहाराचा आहे. हीं पत्रें अगदीं खाजगीच नसलीं तरीहि तीं प्रसिद्ध करण्यापूर्वीं संबंधित व्यक्तींची परवानगी मागण्याचा शिष्टाचार लेखकानें पाळायला हवा होता. पण तेवढीहि नागर रीत त्याच्याकडून दाखविली गेली नाहीं.

शिरडीला साईभक्तांच्या गैरसोयी होतात हें पाहून लेखकाच्या अंतःकरणांत 'कळवळा' उत्पन्न झाला आणि तेथील व्यवस्थेंत सुधारणा दर्शविणाऱ्या कांहीं सूचना त्यानें लिहून पाठविल्या. हा पत्रव्यवहाराचा प्रारंभ. आपल्या पत्रांची उपेक्षा झाली अशी लेखकानें पुस्तकाच्या शेवटीं तक्रार केली आहे. म्हणजे त्याच्या पत्रांना उत्तरें गेलींच नाहींत किंवा त्याच्या सूचनांचा विचारच झाला नाहीं असें नव्हे. त्याला ताबड-तोब उत्तरें गेलीं नाहींत आणि त्याच्या सूचना लगोलग अंमलांत आणल्या गेल्या नाहींत ही त्याची तक्रार आहे.

प्रस्तुत लेखकाच्या सूचना थोड्या तपासून पाहूं.

**पहिली सूचनाः**—'शिरडीस येणाऱ्या प्रत्येक भक्तास तेथील सर्व तऱ्हेची मदत व माहिती संस्थेच्या नोकरवर्गाकडून आपुलकीच्या भावनेनें दिली जावी व त्यांची भक्तांशीं वागणूक सौजन्यपूर्ण असावी.'

म्हणजे 'मदत व माहिती' मिळत नाहीं अशी लेखकाची तक्रार नसून ती आपुलकीच्या भावनेनें दिली जात नाहीं अशी त्याची तक्रार आहे. मिळणारी मदत व माहिती ही आपुलकीनें दिली आहे कीं नाहीं हें ठरविण्याचा निकष कोणता हें लेखकानें सांगितलेलें नाहीं; बरें, मदत व माहिती मिळत असल्यावर नोकरांच्या आपुलकीचीहि अपेक्षा लेखकानें कां बाळगावी हें मला समजत नाहीं.!

इथें एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. शंभर माणसें शिरडीला दर्शनासाठीं आलीं तर जेवढी आस्था व वेळ नोकरवर्ग त्यांच्यासाठीं देऊं शकेल, तेवढी शेंकड्यांनीं अथवा हजारांनीं दर्शनेच्छु माणसें आलीं तर त्या वेळीं देऊं शकणार नाहीं. भक्तांशीं नोकरवर्गाची वागणूक सौजन्यपूर्ण असावी हें मलाहि मान्य आहे. तशी ताकीद संस्थानकमिटीकडून वेळोवेळीं दिली जातेहि. पण पुष्कळदां सौजन्यानें वागणें अशक्यच होतें हेंहि खरें आहे. एकच उदाहरण सांगतों. भक्तांना पूर्वी शिरडीला राहण्याची वगैरे कांहीं सोय नव्हती. तंबू, राहुट्या, झाडांची छाया यांचाच आश्रय लोकांना घ्यावा लागे. तेव्हां भक्तांच्या निवासासाठीं इमारती बांधण्याचें व त्यांत शक्य त्या सोयी करण्याचें व्यवस्थापक समितीनें ठरविलें. तदनुसार जागा मिळविण्याचे प्रयत्न चालू झाले व जसजशी जागा मिळेल तसतशी इमारतीची व्यवस्था होऊं लागली. स्नानगृहें, संडास, नळ इत्यादि सोयी होऊं लागल्या. पुढें असें आढळून येऊं लागलें कीं संडास जरासा दूर पडतो म्हणून न्हाणीघरांचा उपयोग संडासाच्या कामीं मुलाबाळांसाठीं लोक करूं लागले! असें आढळलें म्हणजे नोकरवर्गाला सौजन्यानें वागणें बोलणें—थोडें अवघड आहे हें कोणीहि सुज्ञ कबूल करील.

मी नोकरवर्गाची कड घेतों आहे असें नव्हें. परंतु मला असें म्हणायचें आहे कीं, सर्वसामान्य समाजांत सौजन्याची जी पातळी आहे तीहून शिरडीसंस्थानच्या नोकरवर्गाच्याच सौजन्याची पातळी कमी आहे असें मला वाटत नाहीं.

आणखी एक नाजुक प्रश्न मला विचारावासा वाटतो. या नोकरवर्गाकडून आपुलकी व सौजन्य यांची अपेक्षा करणाऱ्या प्रस्तुत लेखकानें, संबंधित व्यक्तींची परवान घेतांच हें पुस्तक लिहून त्यांत हा पत्रव्यवहार प्रसिद्ध केला; या त्याच्या कृत्यांत सौजन्य व आपुलकी हीं कितीशीं आहेत ?

**दुसरी सूचना**—'गुरुपादुकांसमोरील खोल्यांतून मोऱ्यांची सोय व कपडे वगैरे बदलण्यासाठीं त्याच्यांतच आंतील खोलीची सोय असल्यामुळें, अशा खोल्या कुटुंबांसाठीं म्हणजे ज्यांच्याबरोबर बायकामाणसें आहेत अशांच्या साठींच मुद्दाम राखून ठेवाव्या व अशा भक्तांनाच त्या देण्यांत याव्यात.'

ही सूचना अव्यवहार्य आहे. शिरडीला अशा जितक्या खोल्या आहेत तितक्यांतच समावेश होऊं शकतील इतकींच जर कुटुंबें येणारीं असतीं तर असें करतां आलें असतें. परंतु खोल्या थोड्या व येणारीं कुटुंबें किती तरी अधिक अशी परिस्थिती असल्यामुळें, अशा खोल्या 'राखून' ठेवणें अशक्य आहे. शिरडीस येणारी गर्दी पाहून ही साधी गोष्ट प्रस्तुत पुस्तकाच्या लेखकाच्या ध्यानीं कशी आली नाहीं याचें नवल वाटतें. बायकामाणसांची गैरसोय होऊं नये ही तळमळ फक्त आपल्याच 'सौजन्यपूर्ण' अंतःकरणांत आहे असें लेखकानें समजूं नये. भक्तांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या राहण्याची सोय अधिकाधिक चांगल्या रीतीनें व्हावी यासाठीं संस्थानचे प्रयत्न सुरू आहेत, हें तेथें बांधल्या जाणाऱ्या नव्या इमारतींवरून कळण्यासारखें आहे.

**तिसरी सूचनाः**—'श्री समाधि-मंदिरांत, बुटी वाड्यांत व द्वारकामाईत शक्य तों शांतता ठेवण्याविषयीं तेथील चोपदारांना सूचना द्याव्या. विशेषतः सकाळीं बरेच श्रीसाईभक्त श्रीसाईसच्चरित्राचा पाठ करीत बसलेले आढळतात. व त्यांच्या शेजारींच अथवा आजूबाजूस लहान मुलें दंगा करतात व कांहीं मोठीं माणसेंहि मोठमोठ्यानें घरगुती प्रापंचिक गोष्टींवर किंवा राजकारणावर चर्चा करीत असतात; त्यामुळें गोंगाट होतो. व साईभक्तांच्या वाचनांत व्यत्यय येतो. तेथील सरकारकुनांनीं किंवा इतर जबाबदार इसमांनीं थोड्याशा कळकळीनें व विशेषतः तेथील स्थानांचें महत्त्व जाणून हें शांतता प्रस्थापित करण्याचें काम केल्यास साईभक्तांवर उपकार होतील.'

मोठ्या माणसांनाहि समाधिमंदिरांत शांतता राखण्याचें महत्त्व कळत नाहीं (असें लेखकाच्याच म्हणण्यावरून दिसतें) तिथें चोपदार बिचारा काय करील? सार्वजनिक प्रार्थनामंदिरांत गांभीर्य राखण्याचें महत्त्व ख्रिस्ती वा मुसलमानांना पटतें. पण देवळांतून हिंदु लोकांना ह्या शिस्तीचें वळण नाहीं हा आपला नेहमींचा अनुभव आहे! हा आपल्या समाजाचाच सर्वसामान्य दोष आहे. इतरांच्या पूजनांत वा पठणांत आपल्या गोंगाटानें व्यत्यय येऊं देऊं नये इतकी समजूत जर लोकांनींच आपण होऊन दाखविली नाहीं, तर ही गोष्ट सक्तीनें घडवून आणणें अशक्य आहे. राजकारणाची व घरगुती गोष्टींची मोठ्यामोठ्यानें चर्चा करणाऱ्या लोकांना, खुद्द लेखकानें तरी कळकळीनें व सौजन्यानें तसें करण्यापासून परावृत्त केलें काय?

**चौथी सूचना**—'गरिबांस अन्नदानासाठीं म्हणून पैसे दिल्यावर कोणत्या गरिबांना अन्नदान करावयाचें ते पैसे देणाऱ्या भक्ताच्या मर्जीनुरूप व त्यांच्या समक्ष करण्यांत यावें.'

गरिबांना इतक्या डौलानें अन्नदान करण्याची ज्या भक्ताची (?) मनीषा असेल त्यानें स्वतःच आपल्या हातानें आपल्या मर्जीनुरूप गरिबांना पैसे वांटावेत. कमिटीकडे पैसे देऊं नयेत. अन्नदानासाठीं पैसे देणारे दाते आणि अन्नदान घेणारे गरीब यांची समक्षासमक्ष भेट करून देण्याची ही अजब सूचना जगांतील कोणत्याहि तीर्थावर अथवा पवित्रस्थानावर अंमलांत आणणें कोणत्याहि व्यवस्थापक-समितीला सर्वथैव अशक्य आहे!

**पांचवी सूचना**—'ब्राह्मण-सुवासिनी जेवायला घातल्यास त्याचा संकल्प सोडण्याचा व दक्षिणा देण्याचा हक्क जेवावयास घालणाऱ्या भक्ताकडून बजावला जावा.'

ही सूचनाहि भक्ताला साजेशी नाहीं. भक्त बाबांचें दर्शन घेऊन कृतार्थ होण्यासाठीं येतो, अन्नदान व संपत्तिदान करून त्यागाचें थोडेंसें समाधान मिळविण्यासाठीं येतो; 'हक्क बजावण्यासाठीं' येत नाहीं. व्यक्तिशः मला असें वाटतें कीं ब्राह्मण–सुवासिनीला जेवण घालण्याची प्रथा मुळांतच बंद करावी. ब्राह्मण–अब्राह्मण, हिंदु–मुसलमान असला कसलाहि भेद न ठेवतां भुकेल्या गरिबांस अन्नदान एवढा एकच दानपर्याय निदान सर्वधर्मसमावेशक साईबाबांच्या पुण्यक्षेत्रांत तरी असावा.

**सहावी सूचना**—'दक्षिणा अगर इतर पैसे मनिऑर्डरनें पाठविल्यास त्याची पोहोंच व श्रींचा प्रसाद व उदी निदान एका आठवड्यांत तरी भक्तांस पाठविण्यांत यावी.'

ही सूचना अनवश्यक आहे. माझ्या माहितीप्रमाणें हें काम तत्परतेनें केलें जातें. एखाद्या दिवशीं वा उत्सवाच्या एखाद्या आठवड्यांत एकदम बऱ्याच मनिऑर्डरी आल्यासच थोडा अपरिहार्य विलंब होतो.

**सातवी सूचना**—'भक्तांच्या पत्रांचीं उत्तरें शक्य तेवढ्या लवकर पाठविण्याची व्यवस्था शिरडी संस्थान कचेरीकडून व्हावी. पत्रांचीं उत्तरें पुरेसें पोस्टेज पाठवूनहि शिरडी संस्थान कचेरीकडून मुळींच मिळत नाहींत, हा माझा अनुभव आहे.'

याहि बाबतींत माझ्या माहितीप्रमाणें महत्त्वाच्या पत्रांना ताबडतोब उत्तरें जातात. निरर्थक पत्रांना थोडा विलंब होतो. पण तक्रारी होतात त्या निरर्थक व बाष्कळ पत्रलेखकांकडूनच प्रामुख्यानें होतात, असा माझा अनुभव आहे.

**आठवी सूचनाः**—'संस्थानच्या नोकरवर्गाचें भक्तांशीं वागणें सौजन्याचें असावें व प्रत्येकाची अडचण शक्य तों दूर करण्याची प्रवृत्ति असावी.'

नोकरवर्गाच्या सौजन्याचा ध्यासच लेखकानें घेतलेला दिसतो! कारण हीच सूचना आधीं येऊन गेली आहे.

**नववी सूचनाः**—श्रीसमाधिमंदिराच्या आजुबाजूच्या कांहीं दुकानांतून शृंगारिक लावण्या व नाटक सिनेमांतलीं चटोर पदें ग्रामोफोनवर वाजविण्यांत येतात. तीं बंद व्हावींत व त्या ऐवजीं भक्तिरसप्रधान भजनें अगर पदें वाजविण्याविषयीं दुकानदारांस विनंति करण्यांत यावी. समजुतीनें स्थानाचें माहात्म्य सदर दुकानदारांस समजावून दिल्यास त्याचा खात्रीनें अनुकूल परिणाम होईल अशी माझी खात्री आहे.'

या सूचनेवर माझी लेखकाला नम्र प्रतिसूचना आहे. त्यानें एकदां स्वतःच आपल्या प्रभावी नम्रतेच्या सौजन्यशील उपदेशानें आजूबाजूच्या दुकानदारांचें हृदय-परिवर्तन घडवून आणावें. लेखकाला यशाची खात्री असल्यानें त्याला असें करणें मुळींच जड जाणार नाहीं. व्यवस्थापक समिती वेळोवेळीं विनंती करते; त्याचा परिणाम तात्पुरताच होतो. असें होण्यांत कांहीं गैर आहे असें मलाहि वाटत नाहीं. दुकानदार हे बोलून चालून संसारी. आपल्या संसारी गिऱ्हाइकांना आवडतात तीं गाणीं ते लावतात. साईचिंतनांत मग्न असलेल्या लेखकाचेंहि लक्ष 'हीं गाणीं चटोर आहेत' हें ध्यानांत

येण्याइतकें त्या पदांकडे वेधलेलें होतेंच ! ज्यांच्यावर संस्थानचें नियंत्रण नाहीं त्यांच्याहि वर्तनाला आळा घालण्याचें संस्थानचें कर्तव्य आहे असें लेखकाला वाटतें हें नवल आहे !

या पुस्तकांत लेखकानें आपल्या कार्यक्षमतेची जाहिरात करून संस्थानांत व्यवस्था ठेवण्यासाठीं विनावेतन काम करण्याची तयारीहि दर्शविली आहे ! फक्त त्याला राहायला घर दिलें पाहिजे व त्याच्या व्यवसायाच्या सोयीप्रमाणें वर्षांतून त्याला वाटेल तितके महिने तिथें राहाण्याची व तिथून जाण्याची सवलत पाहिजे. लेखकाच्या या त्यागपूर्ण ' ऑफर'नें कोणाचेंहि हृदय भरून येईल, यांत लवमात्र शंका नाहीं !

छे छे ! एखाद्या साईभक्तानें हें असें पुस्तक लिहावें ही कल्पनाहि मला कशीशीच वाटते.

× × ×

**भक्तांना विनंतिः—**

शिरडी संस्थानची व्यवस्था अगदीं निर्दोष आहे व तींत सुधारणेला कांहीं जागाच नाहीं, असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. तेथील व्यवस्थेंत पुष्कळच अपुरेपणा आहे, आणि अनेक उणीवा आहेत याबद्दल संशय नाहीं. पण व्यवस्थापक समिति आपल्याकडून शक्य तितक्या कसोशीनें भक्तजनांची सोय करण्यासाठीं खटपट करीत आहे. भक्तांनीं केलेल्या सूचना अवश्य लक्षांत घेतल्या जातात. पण पुष्कळदां भक्त येतात ते केवळ चारदोन दिवस गंमतीनें काढण्याच्या बुद्धीनें येतात; आणि आपली गैरसोय झाली म्हणजे रागावतात. त्या लहान खेड्यांत किती सोयी होणें शक्य आहे हें विचारांत घेऊन, शक्य तों राहण्याच्या व्यवस्थेखेरीज इतर सोय आपली आपण करण्याचें ठरवून, व्यवस्थापक मंडळीशीं सहकार्य करून जर भक्त वागतील तर तें उभयपक्षीं सुखाचें होईल.

आर्त व भक्त यांसाठीं अंतःकरण तळमळणाऱ्या बाबांच्या पवित्र स्थानीं येणारा प्रत्येक माणूस प्रसन्न व समाधानी वृत्तीनेंच तेथून परत जावा, अशीच व्यवस्थापक समितीचीहि स्वाभाविकपणेंच आशाआकांक्षा आहे. पण हें कार्य एकट्या व्यवस्थापक समितीच्या हातचें नसून भक्तजन आणि व्यवस्थापक-समिति यांच्या परस्पर सहकार्यानेंच होणारें आहे.

× × ×

'श्रीज्ञानेश्वर माउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति' हा ग्रंथ आमच्याकडे अभिप्रायार्थ आलेला आहे. त्याचें परीक्षण आमचे मित्र वाङ्मय प्रभु श्री. त्रिलोकेकर यांनीं केलेलें आहे तें ह्या अंकाचें वैशिष्ट्य म्हणून आम्हीं प्रसिद्ध करीत आहोंत. अध्यात्मविषयावर श्री त्रिलोकेकर यांचा सखोल व्यासंग असून ज्ञानेश्वरीचें तर त्यांनीं कित्येक वर्षें अभ्यासपूर्वक परिशीलन व चिंतन केलें आहे. त्यांचा परीक्षणात्मक लेख वाचकांना अत्यंत उद्बोधक वाटेल.

— संपादक




संकलक:—**आमचे प्रतिनिधि**

## १ बाबांच्या कृपेनें जागा मिळाली

**श्री.** एकनाथ रामचंद्र कुळकर्णी, इरा फिल्म्स डिस्ट्रिब्यूटर्स, ५३८ शनिवार, पुणें, यांचा अनुभव :—

'मी जागेच्या अडचणींत गेलीं ८।१० वर्षें होतों. ५ रुपये भाड्याच्या एका अगदीं लहानशा खोलींत राहून कसेंतरी दिवस ढकलीत होतों. माझी मित्रमंडळी व हितचिंतक पुष्कळ आहेत आणि ते सर्व माझ्यासाठीं चांगली जागा शोधण्याचा सारखा प्रयत्न करीत होते. जागा खालीं आहे असें आम्हांस कळावें व ताबडतोब आम्ही चौकशीस गेलों तरी ती 'नुकतीच भरली गेली' अशीं उत्तरें आम्हांस कैक वेळां ऐकावयास मिळालीं. थोडक्यांत म्हणजे आतां आम्हांस चांगली जागा मिळणें शक्य नाहीं असें मी मनांत समजलों व जागा मिळण्याचे बाबतींत पूर्ण निराश झालों.

'सुमारें ५।६ महिन्यांपूर्वी माझी पत्नी शकुंतला ही एका मैत्रिणीसमवेत एका नवीन बांधलेल्या जागेंत गेली असतांना तिनें मनांत म्हटलें कीं, 'साईबाबा, जर हीच जागा आम्हांस मिळाली तर मी तुमच्या चरित्राचा सप्ताह: करीन.' असें ती मनांत म्हणते न म्हणते तोंच काय आश्चर्य, ती मैत्रीणच माझ्या पत्नीस म्हणते, 'अहो शकुंतलाबाई, ही जागा खालीं आहे; तर तुम्ही ह्या घराचे मालकास विचारून पहा.' त्याप्रमाणें माझ्या पत्नीनें घराचे मालकास विचारलें. पण त्यानें सांगितलें कीं, ही जागा एका माणसास मीं कबूल केली आहे, त्यानें नकार दिल्यास मग पाहूं.

'माझी पत्नी निराश झाली. परंतु ह्यांत साईबाबांचा कांहीं तरी हेतु असावा असें आम्हांस वाटलें. कारण साईबाबांची प्रार्थना करतांच ती जागा खरोखरच खालीं आहे ही गोष्ट आम्हांस अभावितपणेंच कळली. तेव्हां बाबा आमची निष्ठा पाहात असावेत असें एका मनास वाटलें. म्हणून मग आम्ही बाबांचीच गोष्ट बोलत राहिलों व त्यांचीच सारखी प्रार्थना आम्ही करीत होतों; तों आश्चर्य असें कीं त्याच रात्रीं त्या नवीन घराचे मालक स्वत: आमचेकडे आले व त्यांनीं सांगितले कीं, मीं तुम्हांस जागा दिली आहे तर ती तुम्हीं ताबडतोब ताब्यांत घ्या. मी ५० रुपये भाडे सुद्धां देण्यास तयार होतों, पण आतांपर्यंत मला जागा मिळाली नव्हती. पण अशी आश्चर्यकारक लीला दाखवून बाबांनीं ही जागा मला ( ३५ रु. भाडें आहे ) थोडक्या भाड्यांत मिळवून दिली याचें आम्हां-

लाच नव्हे तर माझ्या सर्व मित्रमंडळींनाही आश्चर्य वाटतें. या प्रसंगानें बाबांवरील माझी श्रद्धा फारच वाढली व बोलल्याप्रमाणें श्रीसाईसच्चरित्राचा सप्ताह केला व नंतर सत्यनारायणही केला. आज (ता. १३–१०–५३) अत्यंत आनंदानें व समाधानानें मी बाबांचे दर्शनास प्रथमच शिर्डीस आलों आहे.'

★

## २ स्वप्नांतील साधु

श्री. आर. व्ही तेंडुलकर, रेल्वे नोकर (राहणार खोली नं. २, तळमजला, शांतारामाची चाळ नं. ४, गिरगांव) मुंबई ४, यांनीं आपणांस झालेला स्वप्नदृष्टांत व त्याची आलेली प्रचीती याबद्दलचा जो अनुभव सांगितला तो खालीं दिला आहे :—

'१९५२ च्या नोव्हेंबर महिन्यांत मी पहिल्यांदा शिर्डीस बाबांचे दर्शनास आलों. बाबांवर माझी आपोआपच श्रद्धा बसली. त्याचा परिणाम म्हणजे मी दर्शन घेऊन परत गेल्यावर दर गुरुवारीं आंघोळ केल्यावर सकाळींच बाबांचें स्तोत्र वाचूं लागलों व त्या दिवशीं उपवासही करूं लागलों. सुमारें सहा महिने लोटल्यावर एका गुरुवारीं रात्रीं मला खालील स्वप्न पडलें.

'**स्वप्नदृष्टांत**—माझेबरोबर माझी कांहीं मित्रमंडळी फिरत असतां भिकाऱ्याचे वेषांत बाबा प्रत्येकाजवळ भिक्षा मागूं लागले. तेवढ्यांत मी त्यांना सहज दिसलों. त्यांनीं मला पाहिल्यावर मीं त्यांना पुरेपूर ओळखलें हें जाणून त्यांनीं माझेकडे पाहून मंदस्मित केलें व माझ्याकडे भिक्षा मागितली. मीं ताबडतोब माझ्या विजारीच्या खिशांत हात घातला तर दोनच पैसे (अर्धा आणा) निघाले. खिशांत आणखी पैसे नव्हते तेव्हां तेवढेच पैसे मीं त्यांना दिले व लांबूनच नमस्कार केला. त्यानंतर त्यांनीं 'तुझें भलें होईल' असें म्हणून माझ्या पाठीवर थाप मारली. इतकें होतें न होतें तोंच उजाडलें.

'मीं उठल्यावर आंघोळ वगैरे केली आणि सहज गॅलरींत येऊन माझ्या मित्रांबरोबर बोलत उभा राहिलों. मला स्वप्नाची वगैरे कांहींच आठवण त्या वेळेस नव्हती. थोड्याच वेळांत एक साधु, अगदीं बाबांसारखाच दिसणारा पण त्याचे गळ्यांत सर्प होता, इतर घरांकडे न जातां आमच्याच दारांत येऊन उभा राहिला आणि त्यानें भिक्षा मागितली. त्याचें एकंदर स्वरूप पाहिल्यावर मला स्वप्नाची आठवण चट्कन झाली आणि त्यास पैसे देण्याकरतां म्हणून मीं माझ्या विजारीच्या खिशांत हात घातला. आश्चर्य असें कीं, त्या वेळींसुद्धां माझ्या खिशांत फक्त अर्धा आणाच निघाला आणि तो चट्कन मी त्या साधूला दिला. त्याबरोबर 'बाबा तुझें भलें करेल' असे शब्द त्यानें उच्चारले आणि कोठें न थांबतां जसा आला तसा तो सरळ परत गेला.

'मग मी घरांत येऊन सर्व हकीगत माझी आई, बहीण वगैरेंना सांगितली. नंतर लगेच ती मंडळी बाहेर येऊन पाहतात, तों साधु आहे कोठें ? पुष्कळ तपास केला पण तो सांपडला नाहीं. माझी आई नंतर मला म्हणाली कीं, तुला साक्षात् बाबा येऊन भेटले, पण तूं असा वेडा कीं त्यांना घरांतही बोलावलें नाहींस. मला पडलेलें स्वप्न आणि

त्याची तावडतोब आलेली प्रचीती यानें मी इतका भांबावून गेलों कीं त्या साधूला घरांत बोलवावयाचें मला भानच राहिले नाहीं. बाबा पुन्हां केव्हांतरी असेच मला प्रत्यक्ष भेटतील याची मला खात्री आहे. अनवधनानें त्यांचा अनादर झाल्याबद्दल मीं त्यांची मनोमनी क्षमा मागितली.'

★

## ३ एक आश्चर्यकारक अनुभव

**श्री.** माधवराव राजाराम जाधव (७१, केसरकर पेठ, सातारा, जिल्हा–उत्तर सातारा) यांनीं ता. १७-१०-५३ रोजीं खालील अनुभव सांगितलाः—

'माझे वडील १९१६।१७ चे सुमारास नगरला मिलिटरी कँपमध्यें नोकरीस असतांना एकदां बाबांचे दर्शनास येऊन गेले होते. जातांना त्यांनीं साईबाबांचा एक फोटो बरोबर नेला होता. मला ही गोष्ट कांहींच माहीत नव्हती. कारण माझे जन्माचे अगोदरच ते १।२ महिन्यांपूर्वी वारले.

'पुढें जून १९५० मध्यें तिघांच्या भागीदारींत साताऱ्यास मी एक घर बांधीत होतों. दोघांनीं आपापल्या रकमा देऊन अर्धवट घर बांधलें व मग माझी पाळी आली. मला ५०० रु. द्यावयाचे होते, पण ते मजजवळ नव्हते. मी फार चिंतेंत होतों. त्याच वेळेस एके रात्रीं मला खालील स्वप्न पडलें—

**स्वप्नदृष्टांत**—मी कॉटवर झोपलों होतों. तशी झोंप लागली नव्हती, पण पैशाची चिंता असल्यामुळें त्याचेंच विचारचक्र डोक्यांत चालू होतें व त्यामुळें मी सारखा अस्वस्थ होत असें. इतक्यांत एक दाढी असलेले म्हातारेसे गृहस्थ (त्यांचे डोक्याला फडकें होतें) मजजवळ आले आणि म्हणाले, 'कां झोपलास?' मी म्हणालों, 'घराच्या कामाकरतां मला ५०० रुपयांची जरूरी आहे व ते मजजवळ नाहींत.' पुढें कांहीं बोलण्याचे अगोदरच त्या म्हातारेबाबांनीं १०।१० रुपयांच्या नोटा असलेलें शंभरांचें एक बंडल अशीं पांच बंडलें काढलीं व तीं माझ्यापुढें केलीं. तीं घेण्याकरितां मीं हात पसरले व तेवढ्यांत जागा झालों.

**प्रचिती**—दुसरे दिवशीं अगदीं सकाळींच एक साधारण ओळखीचे गृहस्थ श्री. एच्. के. शिंदे हे मजकडे आले. दाढी व कॆंस राखलेले, अंगावर पांघरूण, वगैरे स्वप्नांत पाहिल्याप्रमाणेंच त्यांचा वेष होता. फक्त ते जरा तरुण होते. त्यांचा माझा पैशाचा वगैरे कोणताच व्यवहार नव्हता आणि परिचयहि अगदींच साधारण होता. ते आले त्या वेळेस मी वर्तमानपत्र वाचीत कॉटवर पडलों होतों. त्यांनीं विचारलें, 'कां झोंपलास?' आणि त्याबरोबर चपापून मी उठलों. मीं सांगितलें कीं, घराच्या कामाकरतां मला ५०० रुपये हवेत व ते मजजवळ नाहींत. आणि पुढें मी कांहीं बोलावयाचे अगोदरच त्यांनीं लगेच खिशांतून दहा दहाच्या नोटा असलेल्या शंभराचें, बंडल याप्रमाणें ५ बंडलें मला दिलीं व म्हणाले, तुम्हांला जेव्हां सवड होईल तेव्हां परत करा. आणि ते तावडतोब निघून गेले.

'या सर्व गोष्टींचें मला मोठें आश्चर्य वाटलें. मला पडलेलें स्वप्न आणि त्याची आलेली प्रचीती या गोष्टी कशामुळें घडल्या याचा कांहींच उलगडा होईना. मीं ही सर्व हकीगत त्याच दिवशीं लगेच माझे एक स्नेही व हितचिंतक श्री. बी. एल. झेंडे, पेन्शनर नाझर यांना सांगितली. ते म्हणाले कीं, हा श्रीसाईबाबांचा दृष्टांत दिसतो व तो तुम्हांला उगाच मिळणार नाहीं. तुमच्या घरांत कुणीतरी शिर्डीच्या साईबाबांचे भक्त असले पाहिजे, आणि फोटो वगैरे कशाच्या तरी रूपानें बाबांचें वास्तव्य तुमच्या घरांत असलें पाहिजे. तरी तुम्ही चौकशी करा. तेव्हां मीं घरांत चौकशी केली तेव्हां, वर म्हटल्याप्रमाणें माझे वडील शिर्डीस आल्याचें व त्यांनीं बाबांचा फोटो घरीं आणल्याचें मला कळलें. खूप शोध केल्यावर माझ्या वडिलांनीं आणलेला श्रीसाईबाबांचा फोटो ते नेहमीं वाचीत असलेल्या शिवलीलामृताच्या पोथींत सांपडला.

'त्यानंतर मीं बाबांची सर्व माहिती मिळविली आणि त्यांचीं स्तोत्रें, चरित्र वगैरे वाचून काढलें; आणि शिर्डीस बाबांचे दर्शनास प्रथम ऑगष्ट १९५० मध्यें आलों. साईबाबांनीं दाखविलेली लीला अगाध खरीच. त्यांच्याच कृपेनें आज माझें सर्व ठीक चाललें आहे.'

★

## ४ बाबांची इच्छा प्रमाण

बाबांची इच्छा असेल तरच शिर्डीस जाणें कसें शक्य होतें याबद्दल श्री. शेख उस्मान गनी फत्तेमहंमद (शिंपी, घ. नं. ४९८, गुरुवार पेठ, सातारा सिटी) यांनीं आपणांस आलेले अनुभव तारीख १७-१०-५३ रोजीं सांगितले ते खालीं दिले आहेत :—

'मला साईबाबांची अगदींच थोडी माहिती बरींच वर्षें होती. परंतु सुमारें १० महिन्यांपूर्वीं साईबाबांच्या लीलांचा व त्यांच्या शिकवणाचा प्रचार करणारे कसबे खटाव येथील साईभक्त खटावबाबा हे सातारा येथें आले होते. तेव्हां आम्हीं बरीच मंडळी खटावबाबांकडे गेलों आणि त्यांना साईबाबांबद्दल माहिती विचारली. त्यांनीं पण आनंदानें सर्व माहिती सांगितली. त्यायोगें साईबाबांवर माझी श्रद्धा बसली व एकदां शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घ्यावें असा मीं तेव्हांच निश्चय केला. एक दिवस मी कोणत्याही गोष्टीचा विचार न करतां (सोबतीचा, खाण्यापिण्याचा वगैरे) बरोबर जितके पैसे मजजवळ होते तितके घेऊन मी शिर्डीस जाण्यास निघालों. मोटरनें पुण्यास आलों आणि रेल्वे तिकिटासाठीं खिशांतील पैसे बाहेर काढून मोजूं लागलों तों १० रुपये कमी भरले. बराच विचार केल्यावर लक्षांत आलें कीं दहा रुपयांची नोट आपण अनवधानानें घरींच विसरलों. जेवढे पैसे मजजवळ त्यावेळेस होते तेवढ्यांत शिर्डीचा प्रवास करतां येणें शक्य नव्हतें. तेव्हां परत मी सातार्‍यास चुपचाप गेलों. माझी अत्यंत निराशा झाली. परंतु मला जें कळलें होतें कीं साईबाबांची इच्छा असेल तरच त्यांच्या भक्तांचें शिरडीस जाणें शक्य होतें याची प्रचीती मला अनुभवावयास मिळाली.

'पुढें हीच गोष्ट माझे मनांत राहून गेल्यामुळें एक प्रकारची मनाला सारखी टोंचणी लागे. माझा धंदा चालत नव्हता व पैशाची सवड होईना. तेव्हां मीं बाबांची विनवणी केली

कीं शिर्डीस येण्यापुरते भाड्याचे पैसे आपण द्याल तर मजवर कृपा होईल. मजजवळ साईबाबांची तस्बीर आहे व तिच्यासमोर उभा राहूनच मी नेहमी प्रार्थना करीत असतों. ता. २ ऑगष्टपासून मला जरा जास्त मिळकत मिळूं लागली. मी पैसे जमविण्याची कोशीस करूं लागलों, पण तें जमेना. संसारखर्चासच ते पैसे लागत. मग मी निश्चयपूर्वक बाबांची प्रार्थना केली कीं, जोंपर्यंत मला शिरडी येथें होणाऱ्या आपल्या पुण्यतिथी उत्सवास हजर राहतां येणार नाहीं तोंपर्यंत मी डोक्याचे व दाढीचे केस काढणार नाहीं. थोड्याच अवधींत माझा धंदा आणखी चांगला चालूं लागला आणि मला अपेक्षेपेक्षां जास्त पैसे मिळूं लागले. माझा सर्व खर्च भागून मला बाबांचे कृपेनें २४ रु. १३ आणे जास्त मिळाले व तेवढ्या पैशांत मी आज शिर्डीस अगदीं वेळेवर म्हणजे आरतीचे वेळेला आलों. मागें मी निघालों होतों खरा, पण शिर्डीची अगदींच थोडीबहुत माहिती होती व त्यामुळें सोबतची फार आवश्यकता वाटली. पण सोबत मिळाली नाहीं. ह्या वेळेसही मला घरापासून सोबत मिळाली नाहीं, परंतु पुण्यास सातारचे श्री. माधवराव राजाराम जाधव यांची अचानक गांठ पडली व ते माझ्या ओळखीचे असल्यामुळें व त्यांनाही शिर्डीसच जावयाचें असल्यामुळें मला अनायासेंच सोबत मिळाली. मला बाबांच्या ह्या वेळच्या लीलेचें मोठें कौतुक वाटलें. कारण श्री. जाधव यांना बाबांच्या कृपेचा प्रत्यक्ष अनुभव आलेला आहे व ते शिर्डीस २।३ वेळां येऊन गेल्यामुळें त्यांना येथली सर्व माहिती होती. बाबांना ह्या वेळेस मला त्यांचे दर्शनास आणावयाचें असल्यामुळें.माझ्यावरील सर्व संकटें सहज लीलेनें त्यांनीं चुटकीसरशी नाहींशीं केलीं, इतकेंच नव्हे तर एक श्रद्धावान साईभक्त व योग्य मार्गदर्शक मला सोबतीसाठीं दिला.'

★

## ५ पुत्रप्राप्तीची इच्छा पुरविली

श्री. विनायक गोविंद खेर, (नवरोजजी वाडिया मॅटर्निटी हॉस्पिटल, परेल, मुंबई नं. १२) यांनीं तारीख १८–१०–५३ रोजीं खालील अनुभव सांगितला :—

'माझी आतेबहीण सौ. इंदिराबाई वामन मावळंकर हिचें लग्न होऊन सुमारें १५।१६ वर्षें झालीं होती. पहिल्या ३ मुली झाल्या आणि नंतर जवळ जवळ ९।१० वर्षांत तिला कांहींच मूल झालें नाहीं. हल्लींच म्हणजे सुमारें ३।४ वर्षांपासून ह्यांच्या घरीं माझें येणें जाणें वाढलें होतें. मुलाबद्दल गोष्ट निघाली कीं हिचे यजमान नेहमीं म्हणावयाचे, 'आमच्या नशिबी मूल नाहीं.' हिचे यजमान स्वतः ज्योतिषी आहेत आणि ज्योतिषशास्त्राधारें ते आपले म्हणणें मला पटवूं पाहात. ते नेहमीं म्हणावयाचें कीं, त्यांच्या घराण्यांत २।३ भावांपैकीं कोणातरी एका भावास मुलीच व्हावयाच्या. श्री. वामनराव (माझ्या आतेबहिणीच्या यजमानांचें नांव) यांना आणखी दोन भाऊ आहेत व त्या दोन्ही भावांना मुलगे आहेत. पण श्री. वामनरावांना १५।१६ वर्षांत मुलगा झालाच नाहीं, आणि झाल्या त्या सर्व मुलीच. तेव्हां आपल्या नशिबीं मुलगा नाहीं असें या

दोघांचें ठाम मत झालें. श्री. वामनराव तर असेंही म्हणत कीं, जर कदाचित् मुलगा झालाच तर आमचे दोघांचे ग्रहच असे आहेत कीं तो मुलगा तात्काळ मृत्यु पावेल.

'मला बाबांची माहिती असून त्यांच्यावर माझी दृढ श्रद्धा आहे. एक दिवस माझी बहीण मुलगा होण्याबद्दल फार खंत करीत आहे असें पाहून मीं तिला श्रीसाई-बाबांची माहिती सांगितली आणि बाबांना कांहींतरी नवस करण्यास सांगितलें. बाबांचा फोटोही मीं तिला दिला. त्याप्रमाणें अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणानें तिनें गेल्या वर्षी बाबांना नवस केला कीं, 'मुलगा झाला तर त्यास आपल्या पुण्यतिथीचे दिवशीं आपल्या पायावर घालण्यासाठीं म्हणून शिर्डीस आणीन.'

'त्यानंतर दुसऱ्याच महिन्यांत ती गरोदर राहिली आणि योग्य दिवस घेऊन बुधवार ता. २२–४–१९५३ रोजीं रात्रीं आमच्याच हॉस्पिटलमध्यें सुखरूप बाळंतीण झाली; आणि सर्वांच्या कल्पनेस फसवून बाबांच्या कृपेनें तिला मुलगाच झाला. मुलाचें वजनही चांगलें ८॥ पौंड होतें. परंतु थोडा वेळ झाला नाहीं तोंच आम्हांस काळजीनें घेरलें. मुलगा बाहेर आल्यावर रडला नाहीं व त्यास आंकड्या येऊं लागल्या. आंकड्या सारख्या येत. कोणत्याही उपायानें त्या थांबेनात. हॉस्पिटलमधील उपचार चालूच होते, पण गुण नाहीं. तेव्हां मुलगा खरोखरच जाणार आणि ज्योतिषशास्त्र खरें ठरणार, अशी भीति आम्हांस वाटूं लागली. तों उजाडलें. दुसरा दिवस म्हणजे गुरुवारचा दिवस. अत्यंत पवित्र दिवस. आम्हीं मुलास उदी लावली आणि माझ्या आतेबहिणीनें अगदीं कळकळीनें बाबांची प्रार्थना केली कीं, 'बाबा ! ह्या मुलास जगूं द्या. बोलल्याप्रमाणें आम्हीं त्यास शिर्डीस पुण्यतिथीचे दिवशीं आपल्या पायावर घालण्यास चुकणार नाहीं.' मीही याबाबत सारखी प्रार्थना करीतच होतों. थोड्याच वेळांत मुलाच्या दुखण्यास उतारच पडत गेला, व नंतर तो चांगलाच सुधारला. नवस फेडण्यासाठीं म्हणून आज रोजीं मीं, श्री. वामनराव यांना सवड नसल्यामुळें माझे आते बहिणीस शिर्डीस घेऊन आलों व मुलास बाबांचे पायावर घातलें. श्री. मावळंकर यांच्या स्नेह्याचें शिरडीहून पत्र आलें होतें कीं, शिर्डीस उत्सवानिमित्त फार गर्दी राहील व तुमची सर्वच गैरसोय होईल तरी तुम्हीं पुढें यावें. परंतु या गोष्टीनें आमचें मन विचलित झालें नाहीं. बाबांवर दृढ श्रद्धा ठेवून आम्ही येथें आलों आणि बाबांनीं आमची फारशी गैरसोयहि करूं न देतां आमच्या इच्छा तृप्त केल्या व अत्यंत समाधानानें आम्हीं आमचा नवस फेडला.'

★

## ६ बाबांनीं शिर्डीला खेंचून आणलें

**श्री.** गणेश दामोदर ग्रंथे, ज्योतिषी (आर्यांग्ल होरारत्न, कुलकर्णी फ्लॅटस्, दिवाणी कोर्टाजवळ), भुसावळ यांचा अनुभव :—

'मी ता. ९–१९–५३ रोजी प्रथमच शिर्डीस आमचे कुटुंबासह श्रीसाईबाबांचे दर्शनास आलों. माझें वय ७२ वर्षांचें असून प्रकृती फार खराब आहे. मोतिबिंदूचा त्रास आहे; तशांत मेहाच्या त्रासामुळें लघवीस वारंवार म्हणजे अर्ध्या अर्ध्या तासानें

सुद्धां जावें लागतें. आणि पुन्हां कानानें अगदीं फारच कमी ऐकूं येतें. माझ्या दोन मुलींच्या संसाराचा विचका झाल्यामुळें त्यांना आर्थिक मदत करावी लागते व त्यामुळें पैशानें मी फार अडचणींत असतों. या सर्व कारणांमुळें प्रवास म्हटला कीं माझें डोकें उठतें व त्यामुळें मी कुठेंच प्रवासास सहसा जात नाहीं. परंतु बाबांची इच्छा या वेळेस निराळीच होती.

'माझे एक जांवई श्री. आराध्ये हे शिर्डीस गेलीं सुमारें १॥ वर्षे बाबांची सेवा करून राहत होते त्यांच्या भेटीसाठीं म्हणूनही शिर्डीस जाणें माझ्या प्रकृतीमुळें मला सर्वस्वीं अशक्य झालें. परंतु ता. ३-१०-५३ रोजीं ते बडोद्याहून परत शिर्डीस जातांना भुसावळास आमचेकडे उतरले. त्यांनीं व त्यांचे कुटुंबानें (म्हणजे माझ्या मुलीनें) शिर्डीस चलण्याचा मला खूप आग्रह केला; पण मीं त्यांना नकार दिला. शेवटीं मी त्यांना म्हणालों कीं, तुमची आमची भेट आतां झालीच आहे; तर आतांच मी शिर्डीस येण्याचें काय प्रयोजन आहे? येऊं पुढें केव्हांतरी. दुसरे दिवशीं म्हणजे रविवार ता. ४-१०-५३ रोजीं सकाळींच मला एकाएकीं कशी काय कोण जाणें पण प्रेरणा झाली, कीं आपण यांचेबरोबर शिर्डीस जावें. त्याप्रमाणें मीं माझ्या मुलीस सांगितलें. सर्वांनाच आश्चर्य वाटलें. आणि मी सायन ज्योतिषी असल्यामुळें त्या पद्धतीप्रमाणें ग्रह पाहिले आणि प्रवासाचा त्या वेळेसच योग आहे हें दिसून येतांच मलाही मोठें आश्चर्य वाटलें.

'शेवटीं माझ्या पत्नीसह आम्ही सर्वचजण रविवारीं रात्रींच्या पेशावरनें शिर्डीस जाण्याकरतां निघालों. मनमाडला उतरतांच पावसानें आमची जी पाठ पुरवली तिनें मी अगदीं बेचैन झालों. शिर्डीस जाणाऱ्या रेल्वे पॅसेंजरमध्यें पाणीच पाणी झालें होतें. आणि कोपरगांवास जे हाल झाले ते विचारूंच नका. पुढें अत्यंत त्रास सोसून शिर्डीच्या परिसरांत कसे तरी ९ वाजतां आलों; आणि तिथें आमची एस. टी. ची मोटार लेंडी ओढ्यास पूर आल्यामुळें थांबली, ती १२॥ पर्यंत. त्यानंतर कसेतरी आम्हीं घरीं पोंचलों. आणि वैतागानें पुन्हां ग्रह पाहूं लागलों तों हर्शल ग्रह अनिष्ट असल्याचें दिसून आलें आणि त्यामुळेंच हा प्रवासाचा त्रास झाला. अशाहि त्रासांत बाबांनीं येथें आपणांस कां आणलें याचाच विचार मग मी सारखा करूं लागलों. पण कांहींच उलगडा झाला नाहीं. बाबांनीं आपणांस निव्वळ दर्शनासच आणलें या गोष्टींतच समाधान मानण्यास माझें मन तयार होईना.

'आतां आलोंच आहोंत तर बाबांचा पुण्यतिथीचा उत्सव पाहून मग परतावें असें मला वाटूं लागलें व त्याप्रमाणें मी राहिलोंही. ता. १७-१०-५३ ची गोष्ट. रात्रौ ७॥-८ चा सुमार होता. आम्ही साईबाबांच्या लीला गात बसलों होतों. इतक्यांत माझे जांवई हे संस्थानचे एक विश्वस्त श्री. देव यांचे बोलवण्यावरून त्यांचेकडे गेले. थोड्याच वेळांत ते त्यांचेकडून परत आले आणि म्हणतात, 'उद्यां संस्थानतर्फें बाबांचा आराधना-विधि होणार आहे. त्यास १६ ब्राह्मण लागतात. तर तुम्ही त्यांपैकीं एक ब्राह्मण म्हणून येण्यास तयार आहांत का, असें श्री. देवांनीं आपणांस मला

विचारण्यास सांगितलें आहे. विधि व भोजन वगैरे उरकेपर्यंत सुमारें २ तास लागतील आणि तोंपर्यंत तुम्हांस सोवळ्यांतच राहिलें पाहिजे आणि कुठें बाहेर जातां येणार नाहीं. तर सांगा काय तें.' अगदीं प्रथम माझ्या मनांत नकार देण्याचेंच आलें, पण मग एकदम प्रकाश पडला कीं, 'हा बाबांचाच आपणांवर अनुग्रह होय आणि त्यास आपण नकार कसा देणार? लघवीच्या त्रासाचें काय? बाबा पाहून घेतील' असें मनास वाटून मीं होकार दिला.

'अत्यंत आश्चर्याची गोष्ट कीं आराधना-विधि व नंतर भोजन वगैरे मिळून सुमारें २ तास आम्हांस लागले. पण तेवढ्या प्रदीर्घ काळांत लघवीचा कांहींच त्रास झाला नाहीं. ही माझ्या आठवणींत फार मोठीच चमत्कारिक घटना मला वाटते. त्यानंतर मला योग्य ती दक्षणा व प्रसाद मिळाला.

'मला खात्रीपूर्वक वाटतें कीं, माझ्यावर कृपा करण्यासाठींच बाबांनीं मला अक्षरशः खेंचून शिर्डीस आणलें व मला प्रवासाचा होणारा त्रास लक्षांत घेऊनच चांगल्या माहितगार मनुष्यास-म्हणजे प्रत्यक्ष माझ्या जांवयासच त्यांनीं भुसावळास मला घेण्यासाठीं म्हणून पाठविलें. हें सर्व कळून येतांच मनाला समाधान झालें आणि बाबांच्या लीलेचेंहि कौतुक वाटलें.'

★

## ७ बाबांचा प्रसाद

**श्री.** श्रीराम रंजाजी बोरशे (धंदा शिवणकाम, ओझर तांबट, तालुका-निफाड, जि. नाशिक) यांनीं तारीख २२-१०-५३ रोजीं खालील अनुभव सांगितला:—

'श्रीसाईबाबांची साधारणशी माहिती मला बरींच वर्षें होती. पण १९५० सालापर्यंत शिरडीस माझ जाणें झालें नाहीं. त्या वर्षी आमचे मेव्हणे रामदास जगताप यांच्यामुळेंच शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्याचा योग आला. बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन नंतर मी द्वारकामाईंत गेलों. बाबांच्या फोटो खालीं मखमलीची गादी होती व तीवर शेवंतीचीं थोडीशीं फुलें पडलीं होतीं. दर्शन घेऊन बाबांचे समोरच मी बसलों. आणि त्यांचेकडे पाहतां पाहतां, कशी काय प्रेरणा झाली कोणास ठाऊक, मीं मनांत म्हटलें कीं, 'बाबा, आपला प्रसाद मिळाल्याशिवाय मी येथून जाणार नाहीं.' आणि असें म्हणत म्हणत मी बाबांचे ध्यानांत मग्न झालों. साधारण १५।२० मिनिटांनीं मीं डोळे उघडले आणि बाबांकडे पाहिलें, तों फोटो खालीं ठेवलेल्या मखमली गादीवर त्यांचे पायाशींच शेवंतीच्या फुलांवर एक पोळीचा तुकडा पडलेला दिसला. मीं सुरवातीस दर्शन घतलें त्या वेळेस तो तेथें नव्हता याची मला पूर्ण खात्री होती. बाबांनीं माझी अशा रीतीनें होड पुरवून मला प्रसाद दिला याबद्दल त्यांचे किती गुण गावेत तें समजत नाहीं. 'जो जो मज भजे जैशा जैशा भावें। तैसा तैसा पावे मीही त्यासी' हें जें बाबांनीं म्हटलें आहे तें सर्वस्वीं

खरें आहे हें मला वरील अनुभवावरून पटलें. या अनुभवाची पुढें अशी प्रचीती आली कीं, माझा साधारण चालत असलेला धंदा उत्तरोत्तर चांगल्या स्थितींत चालू लागला आणि आज मला कसलीच चिंता नाहीं. ही प्रसादाची पोळी मीं अजूनही जिवाभावापलीकडे जपून ठेवली आहे.

★

## ८ उदीचा प्रभाव

श्री. मूळचंद कपूरचंद आबड, फ्रेममेकर, दाणा बाजार, जालना ( Dn ), जिल्हा औरंगाबाद, यांनीं ता. ११-१०-५३ रोजीं खालील अनुभव सांगितला:—

'दोन वर्षांपासून मला बाबांची माहिती आहे. आतांपर्यंत साधारण ४ वेळेस मी शिर्डीस बाबांचे दर्शनास येऊन गेलों. परत जातांना मी बाबांची उदी बरोबर घेऊन जात असे. तिचा उपयोग अगदीं जरूर तवढाच मी करतों. माझी पूर्ण श्रद्धा त्या उदीवर व बाबांचेवर आहेच. नुकतीच घडलेली गोष्ट. आमचा दूधवाला अप्पा गवळी याची बायको (वय साधारण ५०) प्रदरानें अतिशय आजारी होती. उठण्याची सुद्धां तिला ताकद नव्हती. अर्थात् या गोष्टीची मला कांहींच माहिती नव्हती. त्या गवळ्यानें सर्वप्रकारचे जादूटोणे, देशी विदेशीं औषधें व डॉक्टरी इलाज केले. पण त्याचे बायकोस गुण न येतां ५।५० रु. च्या खड्यांत मात्र तो पडला. ही गोष्ट तो सहज माझा एक मित्र रामचंद्र तेली याचेजवळ बोलला, तेव्हां त्यानें ( याला माझेजवळील उदीचा एकदां अनुभव आला होता ) त्या गवळ्यास माझ्याकडे जाण्यास सांगितलें. म्हणून त्या गवळ्यानें ही सर्व हकीगत मला सांगितली व औषध मागितलें. तेव्हां मीं त्यास बाबांची उदी ४ पुड्यांत बांधून दिली. प्रत्येक पुडींत साधारण १ गुंजभरच उदी घातली होती. ही बाबांची उदी आहे असें त्यास मीं सांगितलेंच नाहीं. हें एक भारी मौल्यवान औषध असून त्याचा गुण श्रद्धा ठेवल्यास तात्काळ येतो, असें मीं त्यास सांगितलें; आणि बाबांच्या ज्या आरत्या शिरडींत प्रत्यहीं होतात त्या सुमारास एकेक (म्ह० सकाळीं ६, दुपारीं १२॥, संध्याकाळीं ६ व रात्रीं १०) पुडी घेण्यास सांगितलें. मजजवळ एक बाबांचा फोटो होता तो त्यास मीं दिला आणि पुन्हां सांगितलें कीं, बाबांचें नांव घेऊन हें औषध तूं तुझ्या बायकोस दे व फोटोसमोर ऊद व उदबत्ती जाळ.

'त्याप्रमाणें त्यानें अगदीं श्रद्धापूर्वक सर्व केलें. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, तिला अवघ्या ३ पुड्यांतच पूर्ण गुण आला; ४ थ्या पुडीची गरजच पडली नाहीं. आणि ज्या बाईला उठण्याचीसुद्धां ताकद नव्हती तीच दुसरे दिवशीं दुधाचा हंडा घेऊन बाजारांत गेली. ही शक्तिही तिला केवळ उदीमुळेंच आली. बाबांचे गुण जितके गावेत तितके थोडेच.'

★

## ९ बाबांनीं 'अर्ज मंजूर केला'

**श्री.** आर. सदाशिव शास्त्री, (सॅनिटरी इन्स्पेक्टर सदर्न रेल्वे डिस्पेन्सरी, बंगलोर २) यांनीं ता. २३–११–५३ रोजीं खालील अनुभव सांगितलाः—

'मी रेल्वे खात्यांतच नोकरीस लागलों व हल्लींहि रेल्वेंतच आहें. लढाईच्या काळांत रेल्वेंतल्या कांहीं नोकरांना सरकारी धोरणानुसार प्रांतिक सरकारनें सिव्हिल खात्यांत बोलावलें होतें. त्या वेळेस सिव्हिल खात्यांत काम करण्याची इच्छा प्रदर्शित केली असेल अथवा अर्ज दिला असेल; परंतु लढाई संपली तरी आम्हीं रेल्वेंतच राहिलों व अर्जाची गोष्ट साफ विसरलों.

'परंतु म्हैसूर सरकारच्या सिव्हिल खात्यांत माझी बदली केल्याचा हुकूम एकाएकीं १९४८ मध्यें मला मिळाला. या बदलीस मीं कबुली दिली नाहीं. परंतु माझें न ऐकतांच आमची रवानगी सिव्हिल खात्यांत ताबडतोब केली. मी सिव्हिल खात्याच्या प्रमुखाकडे रेल्वेची नोकरी, सीनियारिटी व इतर फायद्यांसाठीं धरण्याकरतां अर्ज केला. पण तो नामंजूर होऊन मला कळविण्यांत आलें कीं, तुमचा रेल्वेंतील नोकरीचा संबंध पूर्णपणें सुटला असून या खात्यांतील नोकरांच्या सीनियारिटींत तुमचा क्रमांक शेवटचा आहे.

'आतां काय करावें, असा प्रश्न पडला. कदाचित् रेल्वेंतील अत्यंत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अर्ज केल्यासच माझ्या प्रश्नाची दाद लागेल असें वाटलें. परंतु आतांपर्यंत काय थोडे अर्ज केले होते? हें काम साईबाबांच्या कृपेशिवाय होणें शक्य नाहीं याबद्दल मनाची पूर्ण खात्री झाली. मी साईभक्त आहेंच व माझी त्यांच्यावर भक्ति आहेच. परंतु निराशेच्या पोटीं खरी अंतरीची तळमळ निर्माण झाली व साईबाबांवर ह्या बाबतींत पूर्ण भार टाकला. योग्य तो अर्ज लिहून व रेल्वेंत माझी परत बदली व्हावी अशी इच्छा प्रदर्शित करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रवाना केला; आणि इकडे साईनामाची अक्षरशः घोकणी सुरू केली.

'अशा स्थितींत एक दिवस अचानक मला कळविण्यांत आलें कीं, तुमची बदली परत तुमच्याच खात्यांत झाली आहे. माझा आनंद काय वर्णावा? पुढें माझी सिव्हिल खात्यांतील नोकरीहि रेल्वेंत जमा करण्यांत आली व पूर्वीचे सर्व फायदे चालू राहिले. ही सर्व बाबांची कृपा होय.'

★

## १० विषमज्वरापासून मुक्तता

**श्री.** चंद्रभान भागवत परदेशी, राहाणार टाकळीभान (जि. अहमदनगर) हल्लीं मुक्काम शिर्डी, हे लिहितात:—

'मी सन १९५२ नोव्हेंबर ता. ७ ला राहुरी येथून येथें बदलून आलों व येथें आलेले भक्तलोक श्रीसाईबाबांची भक्ति कशी करतात व भजतात हें पाहून मलाहि उपरती होऊन रोज त्यांचें दर्शन घेत असतों व फावल्या वेळांत श्रींचें नामस्मरण

करीत असतों. पुढें सन १९५३ जानेवारी ता. २३ ला टायफॉईडनें मी आजारी पडलों. जवळजवळ तीन आठवडे अंथरुणावर पडून होतों. परंतु त्या आजारपणांत श्रीसाईबाबांचे उदी शिवाय मीं एकाहि डाक्टरास अगर वैद्यास दाखविलें नाहीं व त्यांचें औषध घेतलें नाहीं. काय करतील तें बाबा करतील, असा पूर्ण विश्वास ठेवून होतों. तापाचे भरांत बाबांची मूर्ति नजरेसमोर दिसावयाची. ते सांगत कीं, 'बेटा तुम घबराना नहीं. हम हैं.' पुढें तीन आठवड्यानंतर मी थोडा बरा होऊन हिंडूं फिरूं लागलों व एक महिन्यांत पूर्ण बरा होऊन मी माझे कामावर हजर झालों.'

★

## ११ कोर्टांतला खटला जिंकला

श्री. शंकर हरि सोनार ( १६३७, शुक्रवार, गवळी, आळी पुणें नं. २ ) यांनीं ता. १९-११-५३ रोजीं खालील अनुभव सांगितलेः—

'बाबांची माहिती बरेच दिवसांपासून आहे. श्रद्धा व भक्ति होतीच, पण ती एका क्षुल्लक वाटणाऱ्या अनुभवानें वृद्धिंगत झाली. १९५२ च्या कार्तिकी एकादशीची गोष्ट. ही आळंदीची एकादशी म्हणून प्रख्यात आहे. दशमीच्या दिवशींच मला वाटूं लागलें कीं, ह्या एकादशीस तरी आईस आळंदीची यात्रा घडून ज्ञानेश्वरांच्या समाधीस नमस्कार करण्याचा पुण्यप्रद प्रसंग घडून यावा. माझी आई आपल्या भावाकडे अहमदनगर जिल्ह्यांतील नेवासें गांवी राहते. आजपर्यंत इच्छा असूनही बरेच वर्षांत आळंदीस जाण्याचा योग आलाच नाहीं. माझ्या मनांत आलें कीं, आपण पत्रसुद्धां पाठविलें नाहीं, मग ती कशी येणार? पण ह्या वेळेस तिनें यावें असें मला फारफार वाटूं लागलें. मीं बाबांची मनोमनीं प्रार्थना केली कीं, माझ्या आईस इकडे पाठवा. नंतर नोकरीस गेलों. बाबांचें सारखें नामस्मरण चालू ठेवलें. योगायोग म्हणा कीं बाबांची लीला म्हणा, मी दुपारीं जेवणास घरीं आलों तर माझी आई आमचेकडे आलेली मला दिसली. अनुभव क्षुल्लक असेल, पण माझी इच्छा बाबांनीं तात्काळ पुरी करून माझी श्रद्धा व भक्ति वाढविली.

'दुसरा अनुभव म्हणजे फेब्रुवारी १९५३ च्या सुमारास मी श्रीसाईसच्चरित्राच्या पोथीचा रोज एक अध्याय शुचिर्भूत स्थितींत वाचीत असे. ४।२ च अध्याय वाचावयाचे राहिले होते. अशा वेळेस आळंदीच्या पिंपळगांवचे श्री. आबा शेळके ह्यांची मुलगी माझकडे आली. ह्या मुलीचें सासर माझ्या शेजारीच होतें. त्यामुळें ह्या मुलीची व माझी ओळख होती. श्री. शेळके ह्यांच्या शेतीचा वाद होता. कोर्टांत खटला होता. खटला वर्ष सहा महिने रेंगाळत होता, आणि तो विरुद्ध जाण्याचा संभव होता. श्रीसाईसच्चरित्रांतील एक अध्याय नित्याप्रमाणें वाचून संपला होता व मी बाबांची आरती करणार होतों. तेवढ्यांत ती मुलगी घाईघाईनें आली आणि तिनें मला विचारलें कीं, ह्या खटल्याचें कसें काय होणार? आतां मी तरी काय सांगणार? पण तिनें २।४वेळां तोच प्रश्न हट्टानें विचारल्यावर, बाबांचें नांव घेऊन तेथें असलेली बाबांची उदी तिला

दिली व सहज, मनुष्यस्वभावाला अनुसरून म्हणा अथवा बाबांच्या प्रेरणेनें म्हणा, मीं म्हटलें, 'भाद्रपद महिन्यांत यश येईल.' आणि पुढें सांगितलें कीं बाबांची उदी शेताच्या भोंवती बाहेरून टाका. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, बाबांच्या कृपेनें हा खटला खरोखरच त्यांच्या मनासारखा झाला. तेव्हांपासून त्यांचीही श्रद्धा बाबांवर बसली आहे.'

★

## १२ बाबांची पावलें

कु. तेजस्विनी वासुदेव रेळे, (क्षत्रिय शांतिनिवास, चाळ नं १, पोर्तुगीज चर्च-समोर, गिरगांव, मुंबई, ४) ह्या लिहितातः—

दिनांक १–१२–५३–मंगळवार होता तो. आमच्या वाडींतील एका इसमाकडे साईबाबांचें पाऊल उमटलें म्हणून मी, माझी आई अन् बहिण तिकडे पाहायला गेलों. तिथें पाऊल उमटलेलें होतें. पण तें आम्हांला स्पष्ट दिसलें नाहीं. त्यानंतर त्या इसमाच्या शेजारी माझ्या आईची आजी रहाते त्यांच्याकडे आम्हीं गेलों. तिथें आमचे ह्याच विषयावर बोलणें झालें. विषयावरून विषय निघाला आणि माझी आई म्हणाली, 'पाहा, साईबाबा आजकाल बऱ्याच लोकांच्या घरीं जातात, पण आमच्याकडे येत नाहींत. आम्हीं काय असें पाप केलें आहे ? आम्हीं एवढी साईबाबांची भक्ति करतों, किती वेळा शिर्डीला जाऊन आलों; बाबांचे दोन सप्ताह केले. तिसरा सप्ताह मुलीकडे चालूच आहे. पण साईबाबा आमच्याकडे येत नाहींत.'

'अग तुझ्याकडे पण साईबाबा येतील' आजीबाई हंसत हंसत उद्गारल्या.

अमळशानें आम्ही जरा विमनस्क मनानेंच घरीं परतायला निघालों; अन् घरीं येतो तों काय आश्चर्य ! साईबाबांनीं आमची प्रार्थना ऐकली. माझें लक्ष देवघरांतल्या साईबाबांच्या प्रतिमेकडे गेलें अन् तत्क्षणीं जमिनीवर गेलें. बाबांच्या फोटोखालींच आम्हांला दोन ओलीं पाऊलें उमटलेलीं दिसलीं. मनांत संशय आला कीं, कुणीतरी ओले पाय घेऊन तिथें गेला असेल. पण लगेंच दुसरे मन म्हणालें, 'पण त्या एवढ्या अडगळीच्या जागेंत कीं जिथें पाय ठेवायला जागा नाहीं तिथें ओले पाय घेऊन घरांतील इसम कोण जाणार ?' मनांतील संशय नाहींसा करण्याकरितां घरांतील मंडळींना आम्हीं विचारणा केली. पण कुणीं होकारार्थी उत्तर दिलें नाहीं. नंतर माझ्या आईनें त्या पावलांवर हात ठेवला. पावलं ओलीं दिसत होतीं. परंतु हाताला तीं ओलीं लागलीं नाहींत. बरं, तेलाची म्हणावीं तर चिकटपणाही भासला नाहीं. आम्हीं तीं पुसून टाकण्याचा प्रयत्न केला, तरी जशींच्या तशींच दिसत होतीं. साहजिकच आमच्या मनांतील संशय पार पार नाहींसा झाला. आम्हीं आजूबाजूच्या मंडळींना बाबांचे पाय पहायला बोलाविलें. त्यांनाहि हीं पावलें खरीं वाटूं लागलीं. आम्हीं त्या गोष्टीचा जास्त प्रसार केला नाहीं. परंतु हां हां म्हणतां ती बातमी वणव्यासरशी सर्वत्र वाडींत पसरली. आणि भाविक भक्त बाबांचा चमत्कार पाहाण्यास धांवत आले.

बुधवारीं पहांटेच मला स्वप्न पडलें. स्वप्नांत आई बाबांच्या प्रतिमेकडे

पाहून कळकळीनें प्रार्थना करीत होती. व बाबांपाशीं कांहींतरी मागणी करीत होती. मीहि आईशेजारी उभी राहून बाबांची मनःपूर्वक प्रार्थना करीत होतें. मीं त्यांच्यापाशीं मागणी केली. मीं त्यांना म्हणाले, 'बाबा, आम्हांला कांहींतरी द्या !'

'अजून तुला काय पाहिजे. तुला पाहिजे तें दिलें. आतांतरी तुझें मन शांत झालें ना ?' प्रतिमेंतून बाबा बोलले. सकाळीं मी जागी झालें तेव्हां मीं हें स्वप्न आईला सांगितलें आणि हीं बाबांचीं नक्कीच पावलें आहेत असें आमचें ठाम मत झालें माणसांची आवकजावक चालू झाली. बऱ्याच लोकांना तीं स्पष्ट दिसत नव्हतीं. भाविक भक्त त्या गोष्टीवर विश्वास ठेवीत होते. परंतु कांहींनीं निंदाहि केली.

हां हां म्हणतां दुपार झाली. भावंडें शाळेंत गेलीं. दुसऱ्या दिवशीं परीक्षा म्हणून मी अभ्यासाला बसलें. आई बाजारांत जायला निघाली. जातां जातां तिनें मला सांगितलें, 'देवघरासमोरच तूं अभ्यास करीत बस. दरवाजा उघडा ठेव. कारण लोक बाबांच्या चरणांचें दर्शन घेण्यास येत आहेत !' एवढें बोलून आई गेली. अन् मीं आईचा शब्द पाळला. अभ्यास करतां करतां एकाएकीं एक लांब काळा सर्प देव्हाऱ्यांतून बाहेर आला. साप पाहिल्यावर सर्वांची पांचावर धारण बसते. तर मी बोलून चालून चवदा वर्षांची मुलगी, मग मी तरी ह्या नियमाला अपवाद कशी ठरणार ? भीतीनें माझें अंग थरथर कांपूं लागलें. डोळ्यांवाटे अश्रू ओघळूं लागले. परंतु अंगाची हालचाल नि तोंडांतून शब्द बाहेर काढण्याची अंगांत धमकच राहिली नाहीं मुळीं. देव्हाऱ्याजवळ त्यानें जमिनीवर पाऊलाकृती जीभ घासली अन् तो तात्काळ अदृश्य झाला. मला ठसठशीत उदीनें भरलेलें पाऊल दिसलें. मी तशीच उठलें अन् शेजारीं धूम ठोकली. लागलीच शेजाऱ्यांना घेऊन आले. माझें अंग थंड पडलें होतें. डोळे आंसवानें डबडबले होते. तात्काळ शेजाऱ्यांनीं पृच्छा केली, 'काय ग तूं एवढी कां घाबरलीस ?' मीं त्यांना घडलेली हकीकत सांगितली. बोलतांबोलतां लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. सकाळीं जे निंदा करून गेले त्यांनाहि आतां तें खरें वाटूं लागलें.

बाबांचें ठसठशीत उदीनें उमटलेलें पाऊल पाहाण्यासाठीं भक्तांची ये-जा रात्रीं बारा वाजेपर्यंत चालू होती.

गुरुवारीं पहांटे पुन्हां बाबांनीं मला दृष्टांत दिला. प्रतिमेवाटे ते माझ्याकडे पाहून म्हणाले, 'काय ग, काल एवढी मला बघून कां घाबरलीस ? एवढं घाबरण्याचं कारण नव्हतं !' त्यानंतर मी जागी झालें. बाबांचें माहात्म्य गुरुवारीं फार असतें. सकाळ-पासूनच माणसांची ये-जा चालू झाली. घरीं सर्वांची मोठ्या बहिणीकडे (चेंबूरला) जाण्याची तयारी चालली होती. माझ्या बहिणीनें साईबाबांचा दुसरा सप्ताह (पहिला सप्ताह आमच्या घरीं) केला होता. अन् त्या दिवशीं सप्ताह-समाप्ति-दिन होता. बहिणीकडे आम्हांला जेवायचें आमंत्रण होतें. परंतु घर बंद करून कसें जायचें ? आम्ही ऐकमक आळीपाळीनें बाबांचें दर्शन घेऊन आलों. दुपारच्या वेळेस भक्तांची गर्दी फार कमी झाली. आम्ही देवघराजवळ बसलों होतों. उठण्या-बसण्याच्या खोलीचा दरवजा

आम्हीं नुसता ओढून घेतला होता. कारण त्या खोलींत कुणीं नव्हतें. कांहीं वेळानें (चारच्या सुमारास) मी दिवाणखान्यांत जाण्यास उठलें. दरवाजा कांहीं केल्या उघडेना. मला अचंबा वाटला. आम्हीं दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! शेवटीं बाबांच्या कृपेनें दरवाजा उघडला. अन् पाहातें तों बाबांच्या मोठ्या फोटोखालीं दुसरें उदीनें भरलेलें ठसठशीत पाऊल दिसलें. आम्हीं सर्व मंडळींनीं त्या खोलींत कुणी आहे का म्हणून पाहिलें. परंतु आमच्या दृष्टीस कुणीं पडलें नाहीं. एकंदरींत बाबांचीं चार पावलें आमच्या घरांत आलीं.

## जाहीर सूचना

श्रीसाईबाबा संस्थानच्या भक्तमंडळाकडून व्यवस्थापक मंडळाची निवडणूक नगर कोर्टाच्या आदेशाप्रमाणें दि. १ जुलई १९५४ पासून ३१ आक्टोबर १९५४ पर्यंत घेण्यांत येईल. दि. ३१-१२-५३ अखेर ज्या सामान्य सभासदांचीं नावें भक्त-मंडळाच्या पटावर असतील त्या सामान्य सभासदांना व:ज्या आश्रयदात्यांचीं व आजीव सभासदांचीं नावें दि. ३० जून १९५४ पर्यंत पटावर असतील त्यांनाच मत देण्याचा आणि निवडणुकीसाठीं उभें राहण्याचा अधिकार राहील.

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थान कमिटी मार्फत
आपला नम्र साई-सेवक
**द. ब. राणे**
सन्मा. चिटणीस


# आर. एन्. शिंदे अ‍ॅण्ड सन्स्

**चष्म्यांचे व्यापारी**

मुख्य दुकान : २०७, गिरगांव रोड, मुंबई ४

शाखा : [१] चामार बाग रोड, परळ, मुंबई १२.

[२] मुकुंद मॅनशन, न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

# सच्चिदानंदाचा साक्षात्कार

माझ्या मनाच्या बागेंत, साऱ्या विश्वाची ग क्रीडा
कसली बाई झाली पीडा, मनासी ग समजेना ॥ १ ॥
माझ्या मनाच्या पेटींत, विचारांचे मौक्तिक-बिंदू
काय बाई झाली जादू, मना माझ्या उमजेना ॥ २ ॥
माझ्या मनाच्या सिंधूंत, ज्ञानाचे इवले बिंदू
त्यांत भरला प्रेम-मधु, गोडी त्याची अवीट हो ॥ ३ ॥
माझ्या मनाचा रांजण, भरला प्रेमाच्या अमृतानें
तृषा कोणीही भागवावी , येऊनी हो तेथें ॥ ४ ॥
माझ्या मनाच्या गांवाला, नाहीं वेशीचें वेष्टण
असंख्य येती जन, प्रेमभरें हो तेथें ॥ ५ ॥
माझ्या मनाच्या शय्येवर, पहुडला हृषीकेशी
परब्रह्म अविनाशी, रुपडें हो त्याचें ॥ ६ ॥
माझ्या मनाच्या गगनांगणीं, उगवला ज्ञानचंद्र
आणि जाहला विवेकानंद, माझ्या धुंद मनाला ॥ ७ ॥
माझ्या मनाच्या सरोवरीं, विहार करी ज्ञानहंस
जीवित हें स्वप्न खास, हेंच वाटे त्यालागीं ॥ ८ ॥
अंतरींच्या तालावर, नाचूं लागे वेडें मन
कोण करी गुणगुण, माझिया ग अंतरांत ॥ ९ ॥
नाच नाचुनी शिणेन, परि न तृप्ति शिणल्यावीण
वेडे सारे वदती जन, काय जाहलें मजलागीं ॥ १० ॥
नेत्रा नाहीं माझ्या नीज, व्यर्थ व्यर्थ होई झीज
साहवेना गजबज, मजला या दुनियेची ॥ ११ ॥
जागृतींत रम्य स्वप्नें, आणि स्वप्नांत जागृति
काय ऐशी जाहली गति, माझीच मला समजेना ॥ १२ ॥
स्वप्नसुमांना या माझ्या, येई सुवास सद्भक्तीचा
गळ्यांत लेवुन हार त्याचा, नाचे माझा सच्चिदानंद ॥ १३ ॥
माझ्या स्वप्नांची सृष्टी, देई मजला दिव्य दृष्टी
प्रेमामृताची सतत वृष्टी, करी माझा सच्चिदानंद ॥ १४ ॥
माझ्या स्वप्नांच्या दुनियेला, नाहीं भीति कळिकाळाची
अखंड वसे सर्वसाक्षी, माझिया त्या दुनियेंत ॥ १५ ॥
माझ्या स्वप्नांच्या दुनियेंत नाहीं तंटा नाहीं वाद
हरि मात्र होउनी धुंद, असे तेथें बैसला ॥ १६ ॥
माझ्या स्वप्नांच्या साम्राज्याचा, सद्गुरु सार्वभौम राजा
त्याचियाच कृपेनें माझा, अज्ञानतिमिर नष्टला ॥ १७ ॥

—सौ. नलिनी मुळगांवकर

# बाबांचा 'ब्रह्मजिज्ञासू'ला उपदेश

लेखक : **पुरुषोत्तम मराठे**

कांहीं महिन्यांपूर्वी कान्हनगडच्या आनंदाश्रमाचे श्रीस्वामी रामदास हे मुंबईला आले होते. त्यांच्या आश्रमाच्या मदतीसाठीं सेंट झेव्हिएर्स कॉलेजच्या सभागृहांत एक नाट्यप्रयोग करण्यांत आला होता. त्या प्रयोगाला स्वामीजी उपस्थित होते. ते तिथून खारला आपल्या मुक्कामीं परत आल्यावर एका भक्तानें त्यांना म्हटलें, 'स्वामीजी ! आपल्याला ईश्वराचा साक्षात्कार झालेला आहे. आपल्या आश्रमाचें कार्य हें पूर्णत: देव-कार्य आहे. अशा कार्यासाठींहि पैसा गोळा करण्याची खटपट आश्रमवासीयांना करावी लागावी हें किती विचित्र आहे !'

स्वामीजी हंसून म्हणाले, 'यांत विचित्र काय आहे ?'

भक्त उद्गारला, 'विचित्र नाहीं तर काय ? ज्याला ईश्वरदर्शन झालें आहे त्याला पैशाची चणचण भासावी हा ईश्वराचा अन्याय नव्हे काय ?'

## सत्कार्याला मदत देण्यानें चित्तशुद्धि

स्वामीजी म्हणाले, 'छे ! छे ! यांत ईश्वराच्या अन्यायाचा प्रश्न येतो कुठून ? रामदासाला जर पैसा हवासा वाटला (स्वामीजी आपला स्वतःचा उल्लेख 'मी' या शब्दानें कधीं करीत नाहींत. 'रामदास' याच शब्दानें करतात !) तर धनसंपदा खेचून आणल्यासारखी रामदासाच्या समोर हात जोडून उभी राहिल. परंतु रामदासाच्या मनांत एकट्या रामाखेरीज अन्य कल्पनेला थारा नाहीं. आश्रमवासी मंडळी पैसा गोळा करतात, त्यासाठीं त्यांना श्रम करावे लागतात. हे पैसे असे मागण्यामागील तत्त्व असें आहे कीं जेव्हां एखादा माणूस सादर अंतःकरणानें सत्कार्याला पैसे देतो, तेव्हां त्यानें केलेल्या या धन-त्यागानें थोड्याशा प्रमाणांत तरी त्याची चित्तशुद्धि होत असते. कामिनी-प्रमाणेंच कांचनाचा लोभ, धन-लोभ, हा माणसाला नित्य संसारांत गुरफटवून ठेवणारा मोठा पाश आहे. नम्रतापूर्वक, भक्तिभावानें जेव्हां एखादा माणूस एखाद्या सत्कार्याला पैसे देतो तेव्हां त्याचें हें दान त्याला स्वतःलाच कल्याणप्रद होत असतें. आश्रम-कार्य हें चालू ठेवण्यासाठीं जेव्हां एखादा माणूस देणगी देतो, तेव्हां त्याच्या हातून घडणारा त्याग हा त्याच्या स्वतःच्या आत्मिक उन्नतीच्या दृष्टीनेंच उपकारक असतो.

'साईबाबांची हकीकत तुम्हांला ठाऊक आहे का ? आपल्याकडे दर्शनाला आलेल्या अनेक लोकांकडे ते पैसे मागत असत. नुसते मागून स्वस्थ बसत नसत, तर ते त्या माणसाकडून पैसे वसूल करीत असत. साईबाबांसारख्या सिद्धपुरुषाला पैशाची काय मातब्बरी होती ! ऋद्धिसिद्धि हात जोडून त्यांच्यापुढें उभ्या होत्या. त्यांना दर्शनार्थी भक्तांच्या पांचपंचवीस रुपयांची काय तमा होती ! पण ते

भक्तांकडून आग्रहपूर्वक पैसे मागून घेत. 'या खिशांतले पैसे दे, त्या खिशांतले दे,' असें सांगून घेत. मागाहून ते सगळे पैसे ते वांटून टाकीत. त्यांनीं धनसंग्रह केला नाहीं किंवा फकिरी बाणा सोडला नाहीं. त्यांचें तें पैसे मागणें आणि भक्तानें त्यांना पैसे देणें, हें त्या भक्तालाच कल्याणप्रद ठरत असे.'

श्रीस्वामी रामदास यांचे हे उद्‌गार मनन करण्यासारखे आहेत. एखाद्या सत्कार्याला आपण जेव्हां देणगीच्या स्वरूपांत कांहीं मदत करतों, तेव्हां तेवढ्या प्रमाणांत त्या कार्याच्या यशाला आपला हातभार लागला अशी अहंकारपूर्वक जाणीव आपल्या मनांत वसत असते. परंतु ही मोठी चूक आहे. आपल्या मदतीनें त्या सत्कार्याचें पाऊल पुढें पडलें असें समजणें हा निष्फळ अहंकार आहे. तें सत्कार्य आपल्या मदतीनें पुढें जात नाहीं किंवा आपल्या साहाय्याविना अडूनहि राहात नाहीं. ईश्वरी इच्छेशिवाय जगांतलें पान हालत नाहीं असें म्हणत असतांना, 'अमकें तमकें कार्य, मी होतों म्हणून पुरें झालें' असे दर्पोद्‌गार काढणें हें किती हास्यास्पद आहे! परंतु असें खुळें वर्तन सदैव आपल्या हातून घडत असतें.

## धनलोभी ब्रह्मजिज्ञासूची गोष्ट

इथें मला त्या ब्रह्मजिज्ञासु धनलोभी माणसाची एक गोष्ट आठवते. श्रीसाईबाबांनीं त्याला केलेला उपदेश प्रत्येक माणसानें आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवण्यासारखा आहे. यासाठीं श्रीसाईसच्चरिताच्या आधारें ती हकीकत येथें सांगतोंः—

एकदां एक भाविक भक्त बाबांच्या दर्शनाला आला. हा भक्त घरचा चांगला सुखवस्तु; संतति आणि संपत्ति या दोहोंची त्याच्यावर कृपा होती. बाबा हे ब्रह्मज्ञानी आहेत, साधुसंतांचे मुकुटमणी आहेत, तेव्हां त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून, त्यांच्याकडून ब्रह्मज्ञानाचा उपदेश घ्यावा, असा विचार करून हा भक्त बाबांना भेटायला आला. बाबांना नमस्कार करून तो विनम्र भावानें त्यांना म्हणाला, 'बाबा, मला ब्रह्म पाहण्याची इच्छा आहे! ही एकमेव इच्छा मनांत धरून मी इथें आलों आहें.'

बाबा म्हणाले, 'एवढेंच ना! कांहीं काळजी करूं नकोस. मी तुला आतांच रोकडें ब्रह्म दाखवितों. अरे, तुझ्यासारखी इच्छा व्यक्त करणारे लोकच दुर्मिळ आहेत या जगांत! लोक येऊन पैसा मागतात, रोगनिवारण करा म्हणतात, मानलौकिकाची इच्छा धरतात, सदैव सुखाची आस मनाशीं बाळगतात. ऐहिक सुखाची वासना मनाशीं ठेवून लोक शिर्डीला धांवें घेतात आणि माझ्या भजनीं लागतात. ब्रह्म कोणीहि मागत नाहीं. अशा सुखासक्त माणसांचा इथें सुकाळ आहे. पण तुझ्यासारखे ब्रह्मजिज्ञासु मात्र खरोखरी फार विरळा.'

असें म्हणून बाबांनीं त्या भक्ताला बसवून घेतलें. नंतर त्याला दुसऱ्या कांहीं कामांत क्षणभर गुंतविलें. आपल्याला त्याच्या प्रश्नाचें भानच नाहीं असें कांहीं काळ दाखविलें. मग एका मुलाला जवळ बोलावून बाबा त्याला म्हणाले, 'अरे! नंदू मारवाड्याकडे जा

आणि त्याला सांग कीं बाबांना आत्तांच निकडीनें पांच रुपये उसने हवे आहेत. ते चटकन दे म्हणावं. आणि त्यानें दिले कीं लगेच घेऊन ये.' मुलगा नंदूच्या घरीं गेला. त्याच्या दाराला कुलुप होतें. तेव्हां तो परत आला आणि बाबांना त्यानें तसें सांगितलें. तेव्हां तोच निरोप सांगून बाबांनीं त्याला बाळा वाण्याकडे पाठविला. पण ही फेरीहि फुकट गेली. बाळा वाणी घरीं नव्हता. तेव्हां बाबांनीं आणखी एक दोन ठिकाणीं त्याला पाठविलें. पण त्या मुलाचे सगळे हेलपाटे फुकट गेले.

त्या ब्रह्मजिज्ञासूच्या खिशांत अडीचशें रुपयांच्या नोटांचें पुडकें होतें. अंतर्ज्ञानी बाबांनीं हें अर्थातच ओळखलें होतें. म्हणूनच त्याची परीक्षा पाहण्यासाठीं त्यांनीं पांच रुपये उसने मागून आणण्याचा खेळ चालविला होता! बाबांना पांच रुपये कांहीं काळ उसने हवे होते. पण तेवढे देण्याचाहि धीर त्या माणसाला झाला नाहीं. ब्रह्म-प्राप्तीसाठीं ज्याचा जीव इतका तहानेला झाला होता, त्याला पांच रुपयांचा लोभ सुटत नव्हता!

## ब्रह्मप्राप्तीचा अधिकारी कोण ?

बाबांची ती निरोपानिरोपी चाललेली पाहून या गृहस्थास स्वस्थ बसवेना. तो अगदीं उतावीळपणें बाबांना म्हणाला, 'बाबा! मला ब्रह्म दाखवितां ना?'

बाबा हंसून म्हणाले, 'अरे, इतका वेळ मीं काय केलं तर! तुला ब्रह्म दाखवि-ण्याचीच खटपट करीत होतों मी! तुला कळलंच नाहीं का? ब्रह्मप्राप्तीसाठीं पंचप्राण अर्पण करावे लागतात, आपलीं इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार या सर्वांचें समर्पण करावें लागतें. ब्रह्मज्ञानाचा मार्ग अत्यंत बिकट आहे. संपूर्ण वैराग्य ज्याच्या अंगांत उत्कटपणें बाणलें आहे अशाच विरक्ताला ब्रह्मदर्शन होण्याची शक्यता असते. विरक्तीचा लवलेश ज्याच्या ठिकाणीं नाहीं त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून काय उपयोग? जो केवळ एकट्या मुक्तीचीच आस ठेवतो आणि इतर कोणत्याहि गोष्टीबद्दल पूर्णतः निरिच्छ असतो, तोच मोक्षाचा अधिकारी ठरतो. अहंकार नाहींसा झाला नाहीं, लोभ संपूर्णतः नष्ट झाला नाहीं, मन निर्विषय बनलें नाहीं तर ब्रह्मज्ञान पुष्कळच दूर आहे म्हणून समजावें. ब्रह्म काय वाटेवर पडलें आहे? गिरिकंदरांत एकान्तीं निवास करून, यमनियमः आणि ध्यानधारणा करण्यांत दीर्घकाळ घालविणाऱ्या व कठोर तप आचरणाऱ्या योग्यांनाहि गुरुकृपेविना जें ब्रह्मरूप आकलन होत नाहीं, तें तुझ्या-सारख्या लोभाविवश माणसाला कसें गवसेल? ज्याची धनासक्ति सुटलेली नाहीं, त्याला कल्पांतींहि ब्रह्मप्राप्ती होणार नाहीं ही निश्चित खूणगांठ बांधून ठेव. आतांच पहा! पांच रुपये उसने मागून आणण्यासाठीं मी निरोपावर निरोप धाडतों आहें. तुमच्या खिशांत त्याच्या पन्नासपट पैसे आहेत. पण तुम्ही आपले स्वस्थ सगळें पाहात बसलेले आहांत. ते पैसे काढा पाहूं बाहेर आतां! अहो ब्रह्म तुमच्या खिशांतच आहे!'

## बहुमोलाचा उपदेश

त्या गृहस्थानें खिशांत हात घालून नोटांचें पुडकें बाहेर काढलें. मोजून पाहातात तों बरोबर अडीचशें रुपयेच भरले! गृहस्थ बाबांचें अंतर्ज्ञान पाहून मनांत विरघळला. त्यानें तें पुडकें बाबांच्या चरणांवर ठेवलें आणि त्यांचा आशीर्वाद मागितला. बाबा म्हणाले, 'हें आपलें ब्रह्मगुंडाळें ठेव गुंडाळून! प्रथम लोभाचें पूर्ण वाटोळें होऊंदे. मग ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी! धनधान्य, संतति—संपत्ति यांमध्यें ज्याचें मन आसक्त आहे त्याला ब्रह्मज्ञान कसें होईल? धनाची आसक्ति फार कठीण असते. वासनेच्या भोंवऱ्यांनीं दुःखाचा डोह भरलेला असतो. मद मत्सर इत्यादि मगरी डोहांत आहेत. हा डोह तरून जाण्यास एकटा विरक्तच काय तो समर्थ आहे. लोभ ज्यां ठिकाणीं आहे त्या ठिकाणीं ध्यान, विरक्ति, मुक्ति यांचा वाराहि असणार नाहीं. लोभ आहे तिथें शांति नाहीं, समाधान नाहीं. एक लोभ अंतःकरणांत आहे तोंवर सर्व जपतपादि साधनें हीं मातीमोल ठरतात. ज्याच्या मनांत देहाभिमान नित्य बाणलेला आहे, विषयचिंतन सदैव चाललेलें आहे, त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करणें म्हणजे गुरु व शिष्य या उभयतांनाहि निष्फळ शीण आहे. पचेल तेंच खावें, नाहीं तर अजीर्णानें आजारी पडावें लागतें. माझ्याकडे ज्ञानाचें भांडार भरपूर आहे. जो जें मागेल तें त्याला मी देईन. पण मागणाऱ्याचें अवसान किती आहे हेंहि पाहावें लागतें. त्याला जेवढें सोसवेल व पचेल तेवढेंच मी त्याला देतों.'

साईबाबांचा हा बहुमोल उपदेश साधकानें नित्य मनांत वागवावा. त्याग आणि अहंकारविस्मृति या दोन शब्दांत सारी साधना सामावलेली आहे. पण ही साधना असिधाराव्रताइतकी दुर्घट आहे. 'ब्रह्मज्ञान नव्हे लेकुरांच्या गोष्टी' हें संतवचन ध्यानांत बाळगून, विनम्र भावानें संतसेवा व ईशचिंतन करणें आणि गुरुकृपा होवो अशी कळकळीची प्रार्थना करणें, एवढेंच काय तें आपणां दुबळ्या पामरांच्या हातून मोठ्या सायासानें घडण्यासारखें आहे.

---

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

रिटेलर्स व होलसेलर्स

टे. नं. २२८४५